क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३१ /०५/२०२३

**परिपत्रक -**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८, दिनांक ३०.०५.२०२३.

**विषय :-** शासन सेवेत गट-क संवर्गात पुनर्नियुक्त माजी सैनिकांना टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या तरतुदींमध्ये सुधारणा करणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८, दि.३०.०५.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०५३०१७०११२४१०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

३१/०५/२०२३

( सुनिता चौधरी )
कार्यालय अधीक्षक
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / नियोजन व समन्वय /विशेष कृती / प्रशिक्षण व खास पथके/ रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन / दहशतवाद विरोधी पथक/आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक / पोलीस उप महानिरीक्षक



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे/महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४



Scanned with CamScanner

**शासन सेवेत गट-क संवर्गात पुनर्नियुक्त माजी सैनिकांना टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या तरतूदीमध्ये सुधारणा करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ३० मे, २०२३.

वाचा:-१) शासन राजपत्र सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०९३/सीआर१०/९३/बारा, दि.३/९/१९९३

२) सामान्य प्रशासन विभाग,शासन अधिसूचना क्रमांक आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२, दि.६/६/२०१७.

३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८,दि.३०/८/२०१८.

४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८,दि.१३/६/२०१९.

५) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. अकंपा-१२२१/प्र.क्र.९८/का-८,दि.२३/६/२०२१.

**प्रस्तावना :-**

शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट क संवर्गातील ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्त होणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधी संदर्भाधिन अ.क्र.४ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास लिपिक टंकलेखक गट क पदाच्या सेवाप्रवेश नियम संदर्भातील शासन अधिसूचना क्र.आरटीआर-२०१४/प्र.क्र.३५५/१२, दि.६/६/२०१७ नूसार त्या कर्मचाऱ्याच्या सेवा समाप्त करण्याची तरतूद आहे.तथापि सदर अनेक कर्मचारी विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर करतात. परंतू विहीत केलेल्या तरतूदीनूसार त्यांच्या सेवा समाप्त न करता प्रशासकीय विभागांकडून टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी झालेला विलंब क्षमापित करण्याचे प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील वरीष्ठ सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर केले जातात.

टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यासाठी झालेला विलंब क्षमापित करण्यासंदर्भात झालेल्या वरीष्ठ सचिव समितीच्या दि.५/८/२०२२ रोजीच्या बैठकीत माजी सैनिक संवर्गातून गट क पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याने,नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि,दोन वर्षाच्या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास, त्याची सेवा समाप्त न करता, अशा कर्मचाऱ्यास विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही असा धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा अशा सूचना समितीने दिल्या आहेत. त्यानुसार ज्याप्रमाणे अनुकंपा तत्वावर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांस टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्र.५ च्या च्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे त्याप्रमाणे शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट क संर्वगातील ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्त होणाऱ्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांना टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रस्तावनेतील वस्तुस्थिती विचारात घेवून संदर्भाधिन अ.क्र.४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून, शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट क संवर्गातील ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्त होणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची कार्यपध्दती या शासन निर्णयाद्वारे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

शासन सेवेत पुनर्नियुक्त माजी सैनिक उमेदवारांना गट क संवर्गातील ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे अशा सर्व पदांवर नियुक्त होणाऱ्या माजी सैनिक कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत व २ संधीत या विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि सदर मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास, त्याची सेवा समाप्त न करता, अशा माजी सैनिक कर्मचाऱ्यास विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. दोन वर्षाच्या विहित मुदतीनंतर ज्यावेळी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यात येईल त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यास वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय होईल. तसेच,विलंबाने प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर विलंबाच्या कालावधीतील देय असणाऱ्या वेतनवाढी हया टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याच्या दिनांकास काल्पनिकरित्या अनुज्ञेय करण्यात याव्यात. तथापि त्या कालावधीतील वेतन व भत्त्यांची कोणतीही थकबाकी संबंधित कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असणार नाही.

या आदेशाच्या दिनांकापासून ही सुधारित तरतूद लागू होईल. परंतू या आदेशाच्या दिनांकास माजी सैनिक प्रवर्गातून शासन सेवेत गट क संर्वगातील पदांवर नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांची टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रकरणे प्रलंबित आहेत त्या प्रकरणी या आदेशातील तरतूदीनूसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र विहित मुदतीनंतर टंकलेखन प्रमाणपत्र सादर झालेल्या ज्या प्रकरणी यापूर्वी अंतिम निर्णय झाला आहे अशा प्रकरणास ही तरतदू लागू होणार नाही.

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १२ ने अनौपचारीक संदर्भ क्रमांक : ३०५/२०२३/१२ दि. २९/०३/२०२३ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०५३०१७०११२४१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUGANDHA DEEPAK PAWAR

Digitally signed by SUGANDHA DEEPAK PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=d4ecddec21f58159928daa9563eab597448bd1556ca3f9caa91 01e05e9a13341, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B7D944728912CB3702FBA035D0A5194884F9C9AE9051 C2DEE02FFCA4B1014CEA, cn=SUGANDHA DEEPAK PAWAR
Date: 2023.05.30 17:04:30 +05'30'

**( सुगंधा पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१.मा. राज्यपालांचे प्रधान सचिव,मलबार हिल,मुंबई.

२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.

३.सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव



Scanned with CamScanner

४.मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधानपरिषद,विधान भवन,मुंबई-३२.
५.सर्व सन्माननीय विधान सभा /विधान परिषद/संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
६.मा.मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
७.सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मुंबई-३२.
८.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा व विधानपरिषद) मुंबई.
९.सचिव,राज्य निवडणूक आयोग,मुंबई-३२.
१०.सचिव,राज्य माहिती आयोग,मुंबई-३२.
११.सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई-३२.
१२.संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे
१३.सचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद
१४.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,महाराष्ट्र राज्य
१५.सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (संबंधित प्रशासकीय विभागामार्फत)
१६.सर्व आयुक्त, महानगर पालिका/नगरपालिका
१७.सर्व मुख्याधिकारी,नगरपरिषदा/नगरपालिका
१८.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९.प्रबंधक उच्च न्यायालय,मुळ न्याय शाखा /अपील शाखा,मुंबई,औरंगाबाद,नागपूर
२०. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण ,मुंबई. औरंगाबाद,नागपूर
२१. प्रबंधक लोक आयुक्त व उप लोक आयुक्त ,मुंबई.
२२.उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
२३.सरकारी वकील,उच्च न्यायालय,मुळ न्याय शाखा /अपील शाखा,मुंबई,औरंगाबाद,नागपूर
२४.सरकारी वकील,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण ,मुंबई. औरंगाबाद,नागपूर
२५.महालेखापाल,लेखाव अनुज्ञेयता,महाराष्ट्र १/२,मुंबई व नागपूर.
२६.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई ३२.
२७.विधीमंडळ ग्रंथालय,विधानभवन मुंबई.
२८.राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे व सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.
२९.निवड नस्ती.



Scanned with CamScanner